महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ◆ ३१ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक०६९ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## मराठा आंदोलकांच्या वाहनांमुळे ठाण्यात वाहतूक कोंडी

### मुंबई-नाशिक महामार्गावर लांबच लांब वाहनांच्या रांगा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे हे उपोषणाला बसले असून त्यांना पाठींबा देण्यासाठी राज्याच्या विविध भागातून मराठा आंदोलक मुंबईत दाखल झाले आहेत.

वाहनांचा भार वाढल्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली असतानाही उपोषणाच्या दुसऱ्या दिवशीही मराठा आंदोलक ठाणे मार्गे मुंबईत जात होते. या वाहनांना पोलिस आनंदनगर नाका येथे पार्किंगसाठी जागा देऊन त्यांना रेल्वे मार्गे पाठवित होते. यामुळे ठाण्यातून जाणाऱ्या मुंबई-नाशिक महामार्गावरील मुंबई मार्गिकवर वाहतूक कोंडी झाली होती.

जरांगे यांना पाठींबा देण्यासाठी ठाणे जिल्ह्यासह नाशिक आणि इतर जिल्ह्यातील नागरिक स्वतःच्या वाहनाने मुंबईत दाखल झाले आहेत. यातील अनेक मराठा आंदोलकांची वाहने ठाणे मार्गे मुंबईत गेली. या आंदोलकांना जेवण आणि अल्पोहाराची व्यवस्था ठाण्यातील मराठा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी केली होती. काहीजण सायंकाळी पुन्हा ठाणे मार्गे घरी परतले. परंतु जरांगे यांना दुसऱ्या दिवशी म्हणजेच, शनिवारीही उपोषण करण्यास पोलिसांनी परवानगी दिली. यामुळे अनेकजण शनिवारी पुन्हा मुंबईत दाखल होण्यास सुरुवात केली. ठाणे मार्गे मराठा आंदोलकांची वाहने मुंबईत जात असल्याने ठाण्यात वाहतूक कोंडी झाली.असे असतानाही उपोषणाच्या दुसऱ्या दिवशीही मराठा आंदोलक वाहनाने ठाणे मार्गे मुंबईत जात होते.

मुंबईत वाहने पार्किंगसाठी जागा शिल्लक राहिलेली नसून रस्त्यावर उभ्या करण्यात येणाऱ्या वाहनांमुळे कोंडी होत आहे. या पार्श्वभूमीवर ठाणे पोलिस आनंदनगर नाका येथे आंदोलकांची वाहने रोखून त्यांना परिसरात वाहन पार्किंगसाठी जागा उपलब्ध करून देत होते आणि रेल्वे मार्गे मुंबईत पाठवित होते. यामुळे ठाण्यातून जाणाऱ्या मुंबई-नाशिक महामार्गावरील मुंबई मार्गिकवर वाहतूक कोंडी झाली होती. या कोंडीचा फटका शहरातील अंतर्गत मार्गांनाही बसला. या कोंडीमुळे वाहनचालक हैराण झाले होते.



मराठा आरक्षणासाठी आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलकांच्या मागण्यांवर निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळाची उप समिती आणि न्यायमूर्ती शिंदे समितीतील सदस्यांची शनिवारी सकाळी बैठक पार पडली. या बैठकीत झालेल्या चर्चेनंतर सरकारचा प्रस्ताव घेऊन शिंदे समितीने दुपारी तीन वाजता जरांगे पाटील यांची भेट घेतली. पण, मराठा आंदोलकांशी चर्चा करण्याचा न्यायमूर्ती शिंदे समितीला कोणताही अधिकार नाही. मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उप समिती किंवा सरकारमधील मंत्र्यांनी थेट चर्चा करण्याची गरज होती. पण, तसे झाले नाही. सरकारला आमच्याबरोबर चर्चा करण्यास तोंड उरले नाही, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी सरकारच्या वतीने शिंदे समितीने मांडलेला प्रस्ताव फेटाळून लावला. तसेच शिंदे समितीने मागील १३ महिन्यांपासून हैदराबाद आणि सातारा संस्थांच्या गॅजेटचा अभ्यास केला आहे, त्यामुळे या बाबत आणखी वेळ देणार नाही, असेही स्पष्टपणे जाहीर केले.

हैदराबाद आणि सातारा संस्थांच्या गॅझेटमध्ये कुणबी नोंदी आहेत. त्यामुळे ही दोन्ही गॅझेट तातडीने लागू करावे. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील मराठा हा कुणबीच आहे, असे गृहीत धरून उद्यापासून प्रमाणपत्राचे वाटप करावे. मराठा आणि कुणबी एकच असल्याचा शासन निर्णय तातडीने काढा. मुंबई सरकार आणि औंध संस्थांनच्या गॅजेटचा अभ्यास करण्यासाठी समितीला आम्ही आणखी वेळ देण्यास तयार आहोत. समितीने त्याचा अभ्यास करून कुणबी नोंदी शोधाव्यात. पण, मराठा आंदोलनात बलिदान दिलेल्या तरुणांच्या कुटुंबीयांना दहा लाख रुपयांची मदत तातडीने दिली गेली पाहिजे. त्याविषयी कोणतीही तडजोड करणार नाही. तसेच मराठा आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे सरसकट मागे घ्या, त्यासाठी आम्ही कोणतीही तडजोड करणार नाही, अशी स्पष्ट भूमिका मनोज जरांगे यांनी जाहीर केली.



## मुलुंडमध्ये १६६ कोटींचे पक्षी उद्यान



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुंबई महापालिकेतर्फे पूर्व उपनगरातील मुलुंड येथे लवकरच एक पक्षीगृह उभारण्यात येणार असून त्यासाठी पालिका प्रशासनाने शुक्रवारी निविदा मागवल्या. मुलुंडच्या या नियोजित उद्यानात १८ दुर्मिळ प्रजातींसह २०६ प्रजातींचे पक्षी ठेवण्यात येणार असून या कामासाठी १६६ कोटी रुपये खर्च अंदाजित आहे.

मुलुंड (पश्चिम) येथील नाहूर गाव परिसरात सर्व सुविधांनी युक्त असे उद्यान तयार करण्यात येणार आहे. तसेच या उद्यानात पक्षीगृह तयार करण्यात येणार आहे. इमारत देखभाल विभागाने या कामासाठी निविदा मागवल्या आहेत. प्रस्तावित मुलुंड पक्षी उद्यान १७,९५८ चौरस मीटर भूखंडावर बांधण्यात येणार असून ते भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणीसंग्रहालयाचे उपकेंद्र असेल. हे काम पूर्ण होण्यास दोन वर्षाचा अवधी लागणार आहे.

या पक्षी उद्यानात आशियाई, आफ्रिकी, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिका अशी पक्ष्यांची क्षेत्रवार विभागणी असणार आहे. प्रत्येक पक्ष्यांच्या प्रजातींचे निवासस्थान उभारण्यात येणार आहे. रेड ब्रेस्टेड पॅराकीट, ब्लॉसम हेडेड पॅराकीट, व्हाईट पीकॉक, मलबार ग्रे हॉर्नबिल, ब्लॅक हंस, ब्लॅक मुनिया, कोकाटू गालाह, ओस्ट्रिचेस, स्कॉलेट, स्कॉलेट, स्कॉलेट या काळाच्या ओघात लुप्त होत असलेल्या दुर्मिळ १८ प्रजातींचे २०६ पक्षी येथे पाहता येणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लवकरच मुलुंड पक्षी उद्यानाचे भूमिपूजन होईल. पक्षी उद्यानात जागतिक दर्जाची सुविधा निर्माण करण्यासाठी सिंगापूरच्या प्रसिद्ध जुरोंग बर्ड पार्कशी सहकार्य करण्याचा आमचा विचार आहे. सुमारे २५ लाख लोकसंख्या असलेल्या पूर्व उपनगरातील नागरिकांना तसेच नवी मुंबई आणि ठाण्यातील रहिवाशांना या बर्ड पार्कमुळे विरंगुळ्याचे ठिकाण उपलब्ध होईल. हे एक प्रमुख पर्यटन आकर्षण म्हणूनही उदयास येईल, असे स्थानिक आमदार मिहिर कोटेचा यांनी सांगितले.

पक्षी उद्यानात प्रशस्त आणि नैसर्गिक निवारे असतील. पक्षांसाठी नैसर्गिक अधिवास तयार करण्यात येणार आहेत. पक्षीगृहात प्रवेश करण्यापूर्वी मोठ्या धबधब्यासह आणि प्रवाहासह पर्यटकांचे स्वागत करण्यासाठी खुले प्लाझा देखील असेल. या पक्षी उद्यानात संवादात्मक कार्यक्रम, कार्यशाळा आणि पक्षी तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातील, असे कोटेचा यांनी सांगितले.

ब्रिटिशांनी एका शतकापूर्वी मुंबईत भायखळा येथे पहिले प्राणीसंग्रहालय उभारले होते. त्यानंतर आता इतक्या वर्षांनी पूर्व उपनगरात पक्षीगृह उभारण्यात येत आहे.

## प्रधानमंत्री मातृवंदना योजनेची राज्यात यशस्वी वाटचाल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : गर्भवती महिला व स्तनदा मातेचे पोषण आणि आरोग्य जपल्यास पुढील पिढी सुदृढ होईल. तसेच मुलींच्या जन्माबाबत सकारात्मकता वाढावी या उद्देशाने प्रधानमंत्री मातृ वंदना योजना महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येते. एकात्मिक बाल विकास प्रकल्पामार्फत या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असून, प्रधानमंत्री मातृवंदना योजनेच्या यशस्वी वाटचालीतून मातांचे आरोग्य, कुटुंबाचा आनंद आणि समाजाचा विकास साधत राज्याचा विकास साधता येणार आहे.

प्रधानमंत्री मातृवंदना योजनेअंतर्गत ३६ जिल्ह्यांचे जिल्हा नोडल अधिकारी आणि बालविकास प्रकल्प अधिकारी तसेच क्षेत्रीय स्तरावरच्या मुख्य सेविकांचे मॅपिंग १०० टक्के पूर्ण झाले आहे. या वर्षासाठी ४० हजार नोंदणी करण्यात आली आहे. उर्वरित उद्दीष्ट लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. केंद्र सरकारने २०२५-२६ वर्षासाठी ५ लाख ७० हजार उद्दिष्ट दिले असून, ते कालमर्यादेत नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात येत आहे. यासाठी योजनेअंतर्गत असेलल्या नियमांची पूर्तता आणि प्रलंबित महिला लाभार्थ्यांना त्यांचा लाभ देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच २०१७ पासून ज्या महिला योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढे आल्या नाहीत, अशा महिलांपर्यंत अंगणवाडी महिला अथवा आशा वर्कर यांच्या सहायाने लाभ पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या महिला व बालविकास मंत्रालयाकडून राज्यात ही योजना राबविण्यात येत होती. त्यांनतर २०१७ पासून ही योजना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविली जात होती. २०१७ पासून आजतागायत ४६ लाख २९ हजार ११९ महिलांनी या योजनेचा लाभ घेतला.

जिल्ह्यांच्या नोडल अधिकाऱ्यांमार्फत ३६ जिल्ह्यात, ५५३ प्रकल्पाचे बाल विकास प्रकल्प अधिकारी, ३,८९९ बीट लेवलच्या मुख्य सेविकांचे प्रशिक्षण घेण्यात आले. मॅपिंगचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे. लवकरच अंगणवाडी स्तरावरील मॅपिंग पूर्ण करण्यात येणार आहे.

गर्भवती व स्तनदा मातांना सकस आहार देणे, गरोदरपणात काम थांबल्यामुळे आर्थिक नुकसानीसाठी मजुरी भरपाई देणे, दुसरे मूल हे मुलगी जन्मास आले असेल तर अतिरिक्त आर्थिक प्रोत्साहन देऊन मुलीबद्दल सकारात्मक दृष्टीकोनास प्रोत्साहन देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. मुलीच्या जन्माबद्दल सकारात्मक दृष्टीकोन वाढावा यासाठी गर्भधारणेच्या नोंदणीपासून सहा महिन्याच्या आत प्रसूतीपूर्व तपासणीसाठी महिलेला ३ हजार रूपये देण्यात येतात. तर बाळाच्या जन्मानोंदणी नंतर दोन हजार रूपये देण्यात येतात. म्हणजेच पहिल्या अपत्यासाठी पाच हजार रूपये देण्यात येतात. दुसरे अपत्य मुलगी असल्यास तिच्या जन्मानंतर सहा हजार रूपये देण्यात येतात.

ज्या कुटुबाचे उत्पन्न प्रतिवर्ष आठ लाख पेक्षा कमी असेल, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती, अंशत: ४० टक्के किंवा पूर्ण अपंग, बीपीएल शिधापत्रिकाधारक, आयुष्यमान भारत अंतर्गत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत लाभार्थी , ई-श्रम कार्ड धारक, किसान सन्मान निधी अंतर्गत लाभार्थी शेतकरी, मनरेगा जॉब कार्डधारक, गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा कार्यकर्ती, अन्नसुरक्षा कायदा २०१३ अंतर्गत रेशनींग कार्डधारक यापैकी किमान एक दस्ताऐवज असल्यास या योजनेचा लाभ घेता येतो. महिलांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी जवळच्या अंगणवाडी केंद्रात संपर्क साधायचा आहे किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र, किंवा उपजिल्हा किंवा जिल्हा रूग्णालयात अर्ज करू शकतात.







## आजचा नियोजित मेगाब्लॉक रद्द

### मध्य रेल्वेने भाविकांसाठी घेतला मोठा निर्णय

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महाराष्ट्रात सध्या गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. त्यातच आता मुंबईसह आजूबाजूला राहणाऱ्या गणेशभक्तांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. दरवर्षी लालबागच्या राजासह इतर प्रसिद्ध गणेश मंडळांच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. या भाविकांची सोय लक्षात घेऊन मध्य रेल्वेने एक मोठा निर्णय घेतला आहे. उद्या रविवार, ३१ ऑगस्ट रोजी होणारा नियोजित मेगाब्लॉक रद्द करण्यात आला आहे. यामुळे गणेशभक्तांना मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच या निर्णयामुळे भक्तांना कोणत्याही अडथळ्याशिवाय लोकलने प्रवास करणं शक्य होणार आहे.

**नेमका निर्णय काय?**

मुंबईत दर रविवारी रेल्वे मार्गांच्या देखभाल दुरुस्तीसाठी मेगाब्लॉक घेतला जातो. यामुळे लोकल सेवा अनिश्चित काळासाठी विस्कळीत होते. यामुळे प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. मात्र, गणेशोत्सवाच्या काळात लाखो भाविक लांबून लालबागचा राजा, गणेशगल्लीचा राजा, चिंचपोकळीचा चिंतामणी, आणि इतर मंडळांच्या दर्शनासाठी मुंबई आणि उपनगरात येत असतात. यावेळी मुंबई शहरातील रस्त्यांवर भक्तांची मांदियाळी पाहायला मिळते. ही गर्दी लक्षात घेऊन आणि गणेशभक्तांच्या सोयीला प्राधान्य देत रेल्वे प्रशासनाने हा सकारात्मक निर्णय घेतला आहे.

**मध्य रेल्वेचा निर्णय काय**

मध्य रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, उद्या रेल्वेच्या तिन्हीही मार्गांवर कोणताही मेगाब्लॉक नसेल. हा मेगाब्लॉक रद्द केल्यामुळे रेल्वेचे वेळापत्रक नेहमीप्रमाणे सुरू राहील. याचा थेट फायदा गणेशभक्तांना होणार आहे. त्यांना आरामात आणि वेळेत आपल्या आवडत्या गणपतीचे दर्शन घेता येणार आहे. रेल्वेच्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. प्रवाशांना कोणतीही अडचण येऊ नये म्हणून प्रशासनाने घेतलेल्या या भूमिकेमुळे भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

दरम्यान गणेशोत्सव काळात रेल्वेने उचललेले हे पाऊल खरोखरच प्रशंसनीय आहे. यामुळे भाविकांचा प्रवासच सोयीस्कर होणार आहे. तसेच लोकल आणि त्याच्या वेळेची चिंता न करता, आरामात बसून प्रवास करून बाप्पाचा आशीर्वाद घेता येणार आहे. रेल्वेच्या या निर्णयामुळे यंदाचा गणेशोत्सव अधिक सुखकर आणि निर्विघ्न ठरेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# गणेशोत्सव : टिळकांच्या प्रेरणेपासून ‘राज्य महोत्सव’ पर्यंतचा प्रवास



भारतीय संस्कृतीतील सर्वाधिक लोकप्रिय उत्सवांपैकी एक म्हणजे गणेशोत्सव. महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात हा उत्सव जल्लोषात, भक्तिभावात आणि सामूहिकतेच्या भावनेत साजरा होतो. हा सण सर्व समाजात आणि घराघरात लोकप्रिय आहे. या उत्सवाचा इतिहास केवळ धार्मिकतेशी जोडलेला नसून, त्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक आयामही गुंफलेले आहेत. लोकमान्य टिळकांनी जुलमी ब्रिटिश सत्तेविरुद्ध जनजागृती व जनतेला संघटित करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्याची प्रथा सुरू केली.या माध्यमातून सामाजिक एकोपा संघटनात्मक चळवळी तसेच कला व सांस्कृतिक उपक्रम सुरु करण्याचे त्यांचे धोरण होते. महाराष्ट्र शासनाने आता एक पाऊल पुढे टाकत या गणेशोत्सवाला ‘राज्य महोत्सव’ म्हणून मान्यता दिली आहे. त्यामुळे यंदाचा गणेशोत्सव राज्य वैभवी बाण्यामध्ये महाराष्ट्रात सर्वत्र सुरु आहे.

### टिळकांचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय

सन 1893 साली लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. त्या काळात ब्रिटिश सत्तेखाली भारतीय समाज उभारी घेऊ शकत नव्हता. सामूहिक संघटनेला दडपशाही होती. परंतु टिळकांनी गणेश उत्सव हा घराघरातील कौटुंबिक वातावरणातून बाहेर आणला आणि त्याला सार्वजनिक व्यासपीठ दिले. हा निर्णय केवळ धार्मिक नव्हता तर सामाजिक एकात्मता आणि राजकीय जागृती घडवून आणणारा होता. मंदिरात किंवा घरात मर्यादित राहिलेला आनंद लोकांच्या,समूहांच्या विविध जाती-पंथांच्या मान्यतेला उतरला. उत्सवाचे सार्वत्रिकरण झाले.पुढे हळूहळू समाजाला एकत्र आणणारा हा उपक्रम बनला.

### गणेशोत्सवाचे प्रदेशनिहाय स्वरूप

महाराष्ट्रातील विविध भागांत गणेशोत्सव वेगवेगळ्या पद्धतींनी साजरा केला जातो. कोकणात हा उत्सव संस्कृतीला उजाळा देणारा असतो. गावी जाऊन कुटुंबासोबत उत्सव साजरा करणे ही कोकणातील वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे. नारळी पोर्णिमा ते विसर्जनापर्यंत निसर्ग, समुद्रकिनारे आणि पारंपरिक घरगुती पूजा यामध्ये एक विलक्षण उत्साह व एकोप्याचे वातावरण अनुभवता येते. या भागातील मूळ कला संस्कृतीची जोपासना व सादरीकरण या काळामध्ये केली जाते. विदर्भ, मराठवाड्यात नाटक, कला, संस्कृती, कवी संमेलन आणि विविध गुण प्रदर्शनाचे आयोजन करणारा महोत्सव म्हणजे गणेश महोत्सव नागपूर, अमरावती, चंद्रपूर यांसारख्या शहरांमध्ये गणेशोत्सवाला विसर्जन मिरवणुकीला अनेक वर्षाची परंपरा आहे. विदर्भातील अनेक नामवंत व्याख्यानमाला या काळामध्ये आयोजित केल्या जातात.सांस्कृतिक कार्यक्रमांची सर्वाधिक रेलचेल या काळात असते.

पुण्यातील अनेक ऐतिहासिक गणपती मंडळांना शंभर वर्षांहून अधिक परंपरा आहे. अनेक मानाची मंडळे आजही परंपरेचे जतन करतात. सांस्कृतिक स्पर्धा, नाटकं, कीर्तनं आणि शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम हे वैशिष्ट्य येथे जपले जाते.देश विदेशातील कलाकारांना स्थान देणारे अनेक फेस्टिवल, उत्सव,कार्यक्रम या काळात पुण्यामध्ये साजरे होतात.पुण्यातला गणेशोत्सव बघायला देशभरातून नागरिक या काळात पुण्यामध्ये येत असतात.

मुंबई म्हणजे गणेशोत्सवाचा महासागर, गिरगावातून सुरु झालेला हा सार्वजनिक उपक्रम या महानगराची ओळख झाला आहे. चाकरमान्यांची सुट्टी, बाजारपेठेत वाढलेली उलाढाल आणि कला-उद्योगाला मिळणारी चालना यामुळे मुंबईतील गणेशोत्सवाला खास आर्थिक महत्त्व आहे. महाराष्ट्रातील सिने, नाट्य कलावंतांचे शहर असणाऱ्या मुंबईमध्ये कला जगताने देखील गणेश उत्सवाला चालना दिली आहे. मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी देखील या काळात बाप्पा विराजमान असतात. प्रत्येक सोसायटीत होणारा गणेशोत्सव, सार्वजनिक सहभागाचे आदर्श उदाहरण ठरते. शिवाय सांस्कृतिक देवाणघेवाण आणि देशभराच्या खाद्य संस्कृतीलाही चालना मिळते.

### उत्सवाचे स्वरूप : धार्मिकतेपासून वार्षिक आनंदोत्सवापर्यंत

गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे पूजा किंवा कर्मकांडामध्ये कोणतीही अनिवार्यता नाही. कोणत्याही जाती, धर्मातील व्यक्ती या उत्सवात सहभागी होऊ शकतात. म्हणूनच हा उत्सव एका धार्मिक मर्यादेपलीकडे जाऊन सामूहिक वार्षिक आनंदोत्सवाचे स्वरूप धारण करतो. दीड दिवस, अडीच दिवस, पाच दिवस, दहा दिवस अशा विविध कालावधीत हा उत्सव आपआपल्या पध्दतीने साजरा केला जातो. शेकडो बाल गणेश मंडळे, सार्वजनिक कार्यक्रमांच्या बिजारोपणासाठी प्रेरणास्त्रोत होऊन जातात. मुलांमध्ये संघटन शक्ती, कला, कौशल्य, नेतृत्व. विकासासाठी हा महोत्सव पुढे येतो. महाराष्ट्रामध्ये घडलेल्या शेकडो कलाकारांना गणेश महोत्सवाच्या व्यासपीठानेच पहिली संधी दिली आहे. हा जागर आताही कायम आहे.

### कला, नेतृत्व व समाजप्रबोधनाचे व्यासपीठ

गेल्या शंभर वर्षांत गणेशोत्सवाने हजारो कलाकार, कवी, नकलाकार, दिग्दर्शक, नेपथ्यकार, शिल्पकार यांना व्यासपीठ दिले. सामाजिक समस्यांवर देखावे, शैक्षणिक संदेश, पर्यावरणपूरक मूर्ती यांमुळे या उत्सवात जागरूकता आणि प्रबोधन घडते. गणेशोत्सव हे नेतृत्व विकसित करणारी शाळाच म्हणावी लागेल. स्वयंसेवकांचे संघटन, व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन या सर्व गोष्टी किशोरवयातील शाळकरी मुलांना,तरुणांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देतात.

### महाराष्ट्र शासनाचा निर्णय : राज्य उत्सवाचा दर्जा

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग बनला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने 2025 पासून गणेशोत्सवाला राज्योत्सवाचा दर्जा दिला आहे.

सांस्कृतिक कार्यमंत्री यांनी विधिमंडळात 18 जुलैला या संदर्भातील घोषणा केली आहे. हा निर्णय घेताना राज्य शासनाने सांस्कृतिक कार्य संचालनालय,पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी,दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगाव,तसेच प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनाही कार्य विभागून दिले आहेत.

राज्य शासनाने आपल्या शासन निर्णयात राज्य महोत्सवामध्ये अधिकाधिक व्यक्ती, संस्था आणि विविध समाज घटकांना सामाजिक सलोख्यांसाठी एकत्रित आणणे. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील गणेशोत्सवाला प्रोत्साहन देणे, विविध सांस्कृतिक विषयाचे जतन व संवर्धन करण्याला प्राधान्य दिले आहे. राज्य महोत्सव अंतर्गत उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर पुरस्कृत करण्याचे नियोजनही राज्य शासनाने केले आहे.राज्यस्तरीय सोहळा आयोजित करण्याची जबाबदारी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीला दिली आहे.विविध स्पर्धांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

### पर्यावरणपूरकतेला प्राधान्य :

राज्य महोत्सवामुळे गणेशोत्सवातील विधायकतेला महत्त्व आले आहे.राज्य शासनाने या उत्सवात आपला सहभाग अधिक सक्रिय केल्यामुळे आता ध्वनी, वायू, जल प्रदूषण विरहित परिसर,एक गाव एक गणपती सारख्या उपक्रमाला प्रोत्साहन, या सोबतच पर्यावरण पूरक मूर्ती पर्यावरण पूरक सजावट व आयोजनातून पर्यावरणाला कोणताही धोका होणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शाडू मातीच्या मूर्ती, विसर्जनासाठी कृत्रिम तलाव, हरित उत्सव अशा उपक्रमांना शासनाचे सहकार्य दिले जात आहे.

शिल्पकार, नृत्य, नाटक, संगीत, चित्रकला या क्षेत्रांतील कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यस्तरीय योजना राबवण्यात येत आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत भजनी मंडळांना अनुदान,राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या गणेश उत्सवांना प्रोत्साहन हे कार्य महत्त्वपूर्ण ठरत आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे यामध्ये जिल्हाधिकारी यांना देखील अधिकार देण्यात आले आहे. गणेश महोत्सवासाठी तालुकास्तरीय जिल्हास्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या आहे.यामुळे सर्व गणेश मंडळांशी जिल्हाधिकाऱ्यांचा अधिक व्यापक संपर्क होणार असून या महोत्सवाची सार्वजनिकता, सार्वजनिक उपयुक्तता व पर्यावरण पूरकता वाढविण्यात येत आहे. या निर्णयामुळे गणेशोत्सवाची परंपरा मर्यादित न राहता संपूर्ण राज्याच्या ओळखीचा आणि अभिमानाचा उत्सव म्हणून गौरविला गेला आहे.

### महाराष्ट्राबाहेर गणेशोत्सव

कधीकाळी केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित असलेला हा उत्सव आज देशभर पसरला आहे. अनेक देशातही हा महोत्सव पोहचला आहे. कर्नाटक, गोवा, गुजरात, मध्य प्रदेश, दिल्ली अशा ठिकाणी मराठी समाजाच्या प्रेरणेने गणेशोत्सव सार्वजनिकरित्या साजरा होतो. विशेष म्हणजे, मुंबई वा पुण्यात राहणारा इतर राज्यातील कामगार, व्यापारी किंवा कर्मचारी हा उत्सव अनुभवतो आणि आपल्या गावी जाऊन त्याची परंपरा नेतो. अशा प्रकारे गणेशोत्सवाने राष्ट्रीय स्तरावर सामूहिकतेचे बंध निर्माण केले आहेत. लोकमान्य टिळकांनी 1893 मध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा सुरू करून समाजाला एकत्र येण्याचा धाडसी मार्ग दाखवला. त्या छोट्या सुरुवातीने आज दीडशे वर्षांचा प्रवास केला आहे. महाराष्ट्र शासनाने या परंपरेला राज्योत्सवाचा दर्जा दिला आहे, हे गणेशभक्तांसाठी अभिमानाचे पाऊल आहे. गणेशोत्सव आता केवळ धार्मिक श्रद्धेपुरता न राहता, तो कला, संस्कृती, समाजजागृती, नेतृत्व आणि आर्थिक चैतन्याचा अविभाज्य भाग बनला आहे. टिळकांचा हा वारसा आज राज्याच्या गौरवाचा उत्सव बनला आहे, त्यामुळे खऱ्या अर्थाने गणपती बाप्पा मोरया!

**– प्रवीण टाके**
**उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर**

---

## पडघा बाजारपेठेत

# गवताच्या गौरी खरेदी करण्यासाठी महिलांची गर्दी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील ४० खेडी, पाडी, गांवाचें विविध स्तरावर केंद्रबिंदू असलेल्या पडघा येथील बाजारपेठेत गवताच्या गौरी खरेदी करण्यासाठी महीलांनी गर्दी केली होती.

गणपती पाठोपाठ गौरीचें आगमन होत असल्याने रविवारी साजऱ्या होणाऱ्या गौरी उत्सवासाठी महीलांची लगबग सुरू झाली असुन पुजेसाठी लागणारे साहीत्य गोळा करण्यासाठी महीलांनी बाजारपेठेत गर्दी केली होती. पारंपरिक पद्धतीने प्रत्येक घरी गवताच्या गौरीची स्थापना करून महीलांकडुन मनोभावे पुजन केले जाते यावेळी महीलांमध्ये उत्साहाचे वातावरण असते त्यामुळे शनिवारी सकाळीच शहापुर, कसारा,



वांसीद, पडघा, परिसरातील आदिवासी महीला आपल्या कच्च्या-बच्च्यासह गवताच्या गौरी घेऊन विक्रीसाठी दाखल झाल्या होत्या मागील वर्षी प्रत्येकी ५० ते ६० रुपये दराने विक्री होणाऱ्या गवताच्या गौरी यावर्षी १०० रुपयांना विक्री केली जात होती मात्र भाव वधारूनही नागरीक, महीलांनी गवताच्या गौरी खरेदीसाठी गर्दी केली होती. यावेळी गवताच्या गौरी विक्रीतून आदीवासी महीलांना चांगला रोजगार मिळाल्याने त्यांच्यात समाधान व्यक्त होत आहे.

**भाद्रपद महिन्यात येर्णाया गौंरी उत्सवासाठी गवताच्या गौंरीमध्ये पावसाळ्यात उगवलेल्या नैंसर्गिक विशिष्ट गवत, फूले, वेली यांचा समावेश असतो विशेष म्हणजे गौंरीची फुले म्हणून प्रसिद्ध असलेल्या ‘कळलावी‘ या वनस्पतीची फुले व इतर साहीत्य जमा करण्यासाठी घनदाट जंगलात जिवावर उदार होऊन फीरावे लागत असल्याचे एका आदिवासी महीला गौंरी विक्रेत्यांनी सांगितले.**

---

# १५० पेक्षा जास्त ट्रकमध्ये गणपतीच्या मूर्ती कचऱ्यात फेकण्याचे मोठे षडयंत्र

## सरकारने तातडीने जबाबदारांवर गुन्हे दाखल करावेत – हिंदु जनजागृती समितीची मागणी

यंदा गणेशोत्सवाला राज्य शासनाने त्याला ‘राज्य महोत्सवाचा’ दर्जा दिला आहे; मात्र ठाणे जिल्ह्यातील डायघर गावातील डम्पिंग ग्राउंडवर कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ गणेशमूर्ती ठेवण्यात आल्याचा संतापजनक प्रकार उघड झाला आहे. हा अवमानकारक प्रकार समाजातच ग्रामस्थांनी दिडशेपेक्षा जास्त डंपर मूर्त्यांसह परत न्यायला भाग पाडले आहेत. या घटनेचा व्हिडिओ सामाजिक माध्यमांवर प्रचंड व्हायरल होत असून संपूर्ण हिंदू समाजाच्या धार्मिक भावना यामुळे तीव्रतेने दुखावल्या आहेत. यापैकी बऱ्याच ट्रकवर 'Vechile on BMC duty' असे असल्याने या गाड्या मुंबई महापालिकेच्या असण्याची दाट शक्यता आहे. गणेशोत्सव हा हिंदूंचा अतिशय श्रद्धेचा उत्सव असून श्रीगणेशमूर्तीची अवमानना ही कोणत्याही हिंदूस असह्य आहे. त्यामुळे संबंधितांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने मुंबई आणि ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलीस आयुक्त तसेच राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.

यापूर्वीच हिंदू जनजागृती समितीच्या वतीने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पर्यावरणमंत्री, तसेच महाराष्ट्रभरातील जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, पोलीस अधीक्षक तसेच संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देऊन गणेशमूर्ती कचऱ्याच्या गाडीत नेऊ नयेत, कृत्रिम हौदात विसर्जन झालेल्या गणेशमूर्तींची कर्मचाऱ्यांनी विटंबना होऊ नये, त्या मूर्ती कचऱ्या, निर्जनस्थळी वा खाणीत टाकू नये यासाठी स्पष्ट मागणी करण्यात आली होती. तरीदेखील प्रशासनाने त्याची अंमलबजावणी न करता हिंदूंच्या श्रद्धेवर घाला घालणारे हे गंभीर दुष्कृत्य घडवून आणले आहे.

गणेशमूर्ती विसर्जनाबाबत मा. न्यायालय व महाराष्ट्र शासन यांचे काही आदेश आहेत; मात्र त्याचा अर्थ हा नाही की भगवान श्रीगणेशाचा अवमान, अनादर करावा, हे प्रशासनाने लक्षात घेतले पाहिजे. हिंदु धर्मशास्त्रानुसार श्री गणेशाचे वाहत्या पाण्यात विसर्जन करण्यास सांगितले आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २५ अंतर्गत प्रत्येक नागरिकाला धार्मिक आचरणाचा अधिकार आहे, त्याचा शासनाकडून भंग होत आहे.

हिंदु जनजागृती समितीची सरकारकडे आग्रही मागणी आहे की, कचऱ्याच्या गाडीतून गणेशमूर्ती नेण्याचा प्रकार थांबवून त्यासंबंधी तातडीने जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत. कृत्रिम हौदांमध्ये गणेशमूर्तींचे विसर्जन करताना कर्मचाऱ्यांकडून होणारी मूर्त्यांची विटंबना त्वरित रोखावी. हिंदूंच्या धार्मिक भावना कुठल्याही प्रकारे दुखावल्या जाणार नाही, हे खबरदारी शासनाने घेतली पाहिजे. आगामी विसर्जनावेळी अशा प्रकारांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी शासनाने कठोर निर्देश राज्यभरात जारी करून त्यांच्या काटेकोर अंमलबजावणीची जबाबदारी घ्यावी.

---

# स्मार्ट व इंटेलिजंट गावांकडे महाराष्ट्राची वाटचाल

## ‘सातनवरी’ ठरले देशातील पहिले स्मार्ट व इंटेलिजंट गाव

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी ‘खेड्यांकडे परत चला’ असा संदेश देत ग्रामीण भारताचे देश विकासात महत्व अधोरेखित केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनीही ‘गाव करी ते राव न करी’ असे उद्बोधन करुन आदर्श ग्रामीण भारताची संकल्पना ‘ग्रामगीता’ या ग्रंथातून मांडली. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व व पुढाकाराने हा ग्रामीण भारत आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्मार्ट व इंटेलिजंट होण्याच्या दृष्टीने पाऊल पुढे पडले आहे. नागपूर ग्रामीणमधील सातनवरी गावात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रायोगिक तत्वावर नुकतेच देशातील पहिल्या स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ केला. स्मार्ट सिंचन, ड्रोनद्वारे किटकनाशके व खत फवारणी, मत्स्यव्यवसाय, सिंचन, आरोग्य, शिक्षण, बँक ऑन व्हिल, स्मार्ट टेहळणी आदी 18 सेवा आधुनिक तंत्रज्ञानाच्या व मुख्यत्वे भारतीय कंपन्यांद्वारे पुरविल्या जात असल्याने हे एक आत्मनिर्भर भारताद्वारे समृद्ध गाव करण्यासाठीचे उत्तम उदाहरण ठरले आहे.

महाराष्ट्राने भारत देशाला स्वातंत्र्य करण्यात व येथील सामाजिक उत्थानासाठी मोलाचे योगदान दिले आहे. स्वातंत्र्योत्तर भारताला रोजगार हमी योजना, माहितीचा अधिकार, महिलांना आरक्षण असे क्रांतीकारी पाऊल उचलत पुढे देशभर त्याची अंमलबजावणी झाली आहे. महाराष्ट्राने देशाला दिलेल्या या महत्वाच्या योगदानात आता स्मार्ट व इंटेलिजंट गावाची भर पडणार आहे. देशातील पहिल्या स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ करतांनाच राज्यातील प्रत्येक तालुक्यामधील 10 असे सुमारे 3 हजार 500 गावे पहिल्या टप्प्यात स्मार्ट व इंटेलिजंट करण्याचा मनोदय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त करत ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरा-मोहरा बदलवून समृद्ध गावांद्वारे भारतीय स्वातंत्र्याच्या शतक वर्षपूर्ती निमित्त संपूर्ण विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी टाकलेले हे महत्वाचे पाऊल आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून देशाला उद्देशुन केलेल्या संबोधनात ग्रामीण भारत तंत्रज्ञानाद्वारे विकास पथावर अग्रेसर करण्याची घोषणा करत ‘भारतनेट’ हा गावा-गावांना इंटरनेटद्वारे जोडण्याचा व पर्यायाने जगाशी ग्रामीण भारताचा संवाद घडविण्यासाठी पुढाकार घेतला. महाराष्ट्रात भारतनेट उपक्रमांतर्गत 2019 मध्ये पहिल्या टप्प्याची यशस्वी अंमलबजावणी झाली व दुसऱ्या टप्प्यासही सुरूवात झाली. राज्याने भारतनेटच्या धर्तीवर ‘महानेट’ कार्यक्रम हाती घेत त्याची अमंलबजावणीही सुरू केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य शासनाने विविध महत्वाचे निर्णय घेवून राज्याला सर्व क्षेत्रात अग्रेसर बनविण्यासाठी पुढाकार घेतला असून कृत्रिम बुद्धीमत्तेच्या वापराद्वारे प्रशासनाला गती व सर्व सामान्यांना उत्तम सोई-सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीनेही निर्णय घेण्यात आले. ग्रामीण महाराष्ट्रालाही उत्तम सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व पर्यायाने गावातील सामान्य माणसाला सबळ करण्यासाठी स्मार्ट व इंटेलिजंट बनविण्याचा महत्वाकांक्षी उपक्रम मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी हाती घेतला.

आत्मनिर्भर भारताद्वारे समृद्ध गाव : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारतातच देशवासियांच्या गरजा पूर्ण करण्याकरिता सर्व क्षेत्रांना आवाहन करत आत्मनिर्भर भारताची संकल्पना मांडली. याला प्रतिसाद देत देशात विविध क्षेत्रांमध्ये देशी बनावटीच्या वस्तू व तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात विकसित होत आहे. याच दिशेने एक पाऊल पुढे जात केंद्रीय दूरसंचार मंत्रालयांतर्गत कार्यरत व्हाईस ऑफ इंडियन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी एंटरप्रायजेसने (व्हाईस) देशांतर्गत कंपन्यांच्या संघटनांसोबत एकत्र येत देशातील स्मार्ट इंटेलिजंट गाव बनविण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समक्ष ठेवला.









**मेष**
तुमच्याकडे खूप काम असले तरीही तुम्ही तुमच्या कुटुंबाला प्राधान्य द्याल.मुलांची कोणतीही समस्या सोडवण्यासाठी तुमचे योगदान आवश्यक आहे,.

**वृषभ**
त्यामुळे मुलांशी बोला आणि त्यांना चांगल्या गोष्टी समजावून सांगा. भागीदारी व्यवसायात, एकमेकांशी समन्वय साधणे महत्वाचे आहे.

**मिथुन**
मित्रांसोबत बाहेर जावे लागेल.अनवधानाने घरातील वडीलधाऱ्यांचा मान-सन्मान दुखावला जाणार नाही याची काळजी घ्या. रागावर नियंत्रण ठेवा.

**कर्क**
कोणतीही नवीन व्यवसाय योजना करण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार करा. इतरांच्या कामात ढवळाढवळ करू नका किंवा योजना करू नका.

**सिंह**
पालकांचे सहकार्य मिळेल आणि त्यांचा सल्लाही घ्याल. आज, आर्थिक स्थिती स्थिर राहणार आहे.जुन्या नकारात्मक गोष्टींना वर्तमानावर वर्चस्व देऊ नका.

**कन्या**
जवळच्या व्यक्तीशी संबंध बिघडू शकतात. तुमच्या जवळच्या व्यक्तीच्या वैवाहिक जीवनातील समस्यांमुळे तुम्ही चिंतेत असाल.

**तूळ**
इतरांच्या जीवनात ढवळाढवळ करण्यापेक्षा आपले जीवन चांगले बनवण्याचा प्रयत्न करावा.आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**वृश्चिक**
तुम्ही करत असलेल्या प्रत्येक गोष्टीत अती शिस्तबद्ध आणि कठोर असण्यामुळे इतरांना त्रास होऊ शकतो. तसेच कर्मचाऱ्यांच्या सल्ल्याला महत्त्व द्या.

**धनु**
पती-पत्नीच्या नात्यात गोडवा येईल.आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. तुमच्या आरोग्यासोबतच कुटुंबाच्या आरोग्याकडेही लक्ष द्या.

**मकर**
तुमचे एखादे काम प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असेल तर ते आज पूर्ण होईल.मुलांबाबत तुम्हाला जी काही चिंता असेल ती दूर होईल.

**कुंभ**
तुम्ही एखाद्या धार्मिक किंवा अध्यात्मिक ठिकाणी वेळ घालवू शकता. वाद टाळा.कोणताही जुना आजार आज पुन्हा उद्भवू शकतो.

**मीन**
आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी कल्पकतेने विचार करा आणि यश मिळवा.तुम्ही आत्मपरीक्षण कराल आणि तुमचे व्यक्तिमत्व सुधारण्याचा विचार करा.


नियमित वाचा
दै. ठाणे जीवनदीप वार्ता



# कल्याणात साकारला अभिजात मराठी भाषेचा देखावा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण येथील अहिल्यादेवी चौक क्षत्रिय धनगर समाज बाळ मित्र गणेश, मेळा क्रमांक 2 यांनी यंदा अभिजात मराठी भाषेचा इतिहास, संस्कृती आणि मराठी जपण्यासाठी ती येणाऱ्या पिढीमध्ये रुजवली पाहिजे ह्या संकल्पनेवर देखावा साकारला आहे. मंडळाची स्थापना 1890 ला झाली असून यंदाचे 135 वे वर्ष आहे. यंदाचे अध्यक्ष समीर मानकर आहेत. या देखाव्याची सजावट- संकल्पना सारंग केळकर यांनी केली असून श्रींची मूर्ती मीनल लेले खरे यांनी पर्यावरणपूरक कागदी लगद्या पासून साकारली आहे.

# ठाणे जिल्ह्यात क्रीडासंग्राम महोत्सवाचा शानदार शुभारंभ

## यंदा पोहणे,हाफ मॅरेथॉन,अंडरआर्म क्रिकेट,बैलगाडा शर्यतीचा समावेश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण लोकसभेचे शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पेनतून साकारलेल्या खासदार क्रीडासंग्राम महोत्सवाचा शानदार शुभारंभ सोहळा भारताचा माजी क्रिकेटपटू व खासदार हरभजनसिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत आज ठाण्यात पार पडला. यंदा खासदार क्रीडासंग्रामचे दुसरे वर्ष आहे. येत्या १५ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान अंबरनाथ, उल्हासनगर, दिवा, कळवा-खारेगाव, डोंबिवली, ठाणे, मुंब्रा येथे हा महोत्सव होणार असून यात १ लाख खेळाडू सहभागी होतील. या शुभारंभ सोहळयाला खासदार डॉ. शिंदे यांच्यासह खासदार नरेश म्हस्के, आणि विविध क्रीडा संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

खासदार डॉ. शिंदे म्हणाले की, खासदार क्रीडासंग्राम ही केवळ स्पर्धा नसून प्रेरणादायी चळवळ आणि तरुणाईला योग्य दिशेने नेणारी संकल्पना आहे. इनडोअर, आऊटडोअर खेळांसोबतच लेझीम, प्रो गोविंदा, ढोलताशा स्पर्धा अशा भारतीय खेळांचाही यंदा खासदार क्रीडासंग्राममध्ये समावेश करण्यात आला आहे. यामुळे जास्तीत जास्त खेळाडू या महोत्सवात सहभागी होऊ शकतील, असे ते म्हणाले. गोविंदा उत्सवाला खेळाचा दर्जा देण्याचे काम तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. वर्षानुवर्ष सराव करणाऱ्या गोविंदांना प्रो गोविंदा स्पर्धेत सहभागी होता येईल, असे ते म्हणाले.



पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही या वर्षी खासदारांना सांसद खेल महोत्सव आयोजित करण्याचे आवाहन केले. मात्र याची सुरुवात गेल्या वर्षीपासून आपण खासदार क्रीडासंग्राम आयोजित करत आहोत, असे ते म्हणाले. मागील वर्षी या महोत्सवात ३० हजारांहून अधिक खेळाडू सहभागी झाले होते. यंदा एक लाख खेळाडू सहभागी होतील, असा विश्वास खासदार डॉ. शिंदे यांनी व्यक्त केला.

खेळ व्यक्तिमत्त्व विकास, शिस्त, संघभावना, मेहनत आणि आत्मविश्वास वाढवतो. देशाच्या प्रगतीत खेळांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे, असे ते म्हणाले. खेलो इंडिया", "फिट इंडिया मूव्हमेंट" सारख्या उपक्रमांमुळे भारतीय खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तर गाठत आहेत. नवे खेळाडू, नवी ऊर्जा, उत्साह आणि आत्मविश्वास दिसणार आहे. कल्याण मतदारसंघाला क्रीडाक्षेत्रात नवे स्थान मिळवून देण्याचे सामर्थ्य आहे, असे ते म्हणाले. स्थानिक खेळाडूंना खासदार क्रीडासंग्रामच्या निमित्ताने मोठ्या मंचावर चमक दाखवण्याची संधी मिळेल, असे ते म्हणाले.

या महोत्सवाची विस्तृत माहिती ९३३८५६७५६७ क्रमांकावर उपलब्ध आहे. या क्रमांकाला मिस्ड कॉल दिल्यास एक लिंक पाठवली जाईल, ज्यात महोत्सवातील स्पर्धेची माहिती मिळेल, असे ते म्हणाले. यातील सहभागी खेळाडूंना त्यांच्या सुरक्षेसाठी जीवन विमा देखील काढण्यात येणार आहे. तर त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी खेळाडूंना शिष्यवृत्ती देखील देण्यात येणार आहे.

# द इंडियन ख्रिश्चन असोसिएशनचे मराठा आरक्षणासाठी जरांगे पाटील यांना समर्थन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीला द इंडियन ख्रिश्चन असोसिएशनने मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा दिल्याचे पत्र देत या आरक्षणाला समर्थन दिले असल्याची माहिती कल्याणातील 'द इंडियन ख्रिश्चन असोसिएशन' चे संस्थापक-अध्यक्ष नोवेल साळवे यांनी कल्याणात दिली.

द इंडियन ख्रिश्चन असोसिएशन'चे संस्थापक-अध्यक्ष नोवेल साळवे यांनी सांगितले की मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या जरांगे पाटील यांना पाठिंबा देणारे लेखी पत्र दिले आहे. महाराष्ट्रातील मराठा समाजासाठी आंदोलन करणारे जरांगे पाटील कायदेशीररित्या आरक्षणाची मागणी करत असतील तर सरकारने त्याचा विचार करून आरक्षण द्यावे. साळवे यांनी राज्य आणि केंद्र सरकारच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित केला. एकेकाळी जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे राज्य सरकार अडचणीत आले होते. परंतु त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने जरांगे पाटील यांची फसवणूक केली. संपूर्ण ख्रिश्चन समुदाय आरक्षणा साठी आंदोलन करणाऱ्या सकल मराठा समाजाचे संस्थापक जरांगे पाटील यांना पाठिंबा देत असल्याचे सांगितले.

# सेवानिवृत्त कर्मचा-यांना भिवंडी महानगरपालिकेचा निरोप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : महानगरपालिका सेवेतून नियत वयोमानाप्रमाणे ०८ कर्मचारी सेवानिवृत्त व स्वेच्छा निवृत्त झाल्याने महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा. प्र. से) यांनी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेतर्फे सेवानिवृत्त कर्मचा-यांना कार्यक्रमाच्या माध्यमातून निरोप देणेत आला. याप्रसंगी सहाय्यक आयुक्त (आरोग्य) श्री. शैलेश दोंदे यांच्या शुभहस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यांत आला आणि त्यांनी सेवानिवृत्त कर्मचा-यांना त्यांच्या पुढील आयुष्याकरीता शुभेच्छाही दिल्या.महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीच्या तिस-या मजल्यावरी मा.आयुक्त यांचे सभागृहात संपन्न झालेल्या या निरोप समारंभाच्या कार्यक्रमातून बाळाराम जाधव ,सहा. आयुक्त तथा प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्रमांक ५, सेवानिवृत्त, महेंद्र सुकीर गायकवाड, लिपिक, सेवानिवृत्त, सोहेल अह. मोह. युसुफ मोमीन ( इलेक्ट्रिशियन), सेवानिवृत्त, श्रीमती राधिका कृष्णा शेलार (वॉचमन) सेवानिवृत्त, सिद्धू लक्ष्मण चव्हाण सफाई कामगार, सेवानिवृत्त, संजय लक्ष्मण वाघचौर , सफाई कामगार, सेवानिवृत्त, बबन शंकर वाणी, सफाई कामगार सेवानिवृत्त, शोभा दशरथ जाधव सफाई कामगार अशा ०८ सेवानिवृत्त मनपा कर्मचा-यांना महानगरपालिकेच्यावतीने आज निरोप देण्यांत आला. या प्रसंगी मनपा अधिकारी व कर्मचारी, सर्व कर्मचारी संघटना प्रतिनिधी, सेवानिवृत्त कर्मचा-यांचे कुटुंबातील सदस्य इ. उपस्थित होते.

# परिचिताच्या ब्लॅकमेलिंगने युवतीची आत्महत्या

## टिटवाळा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : परिचित व्यक्तीकडूनच सतत ब्लॅकमेलिंग होत असल्याने मानसिक त्रासाने खचलेल्या 26 वर्षीय युवतीने दोन दिवसांपूर्वी आत्महत्या केल्याचे आता समोर येऊ लागले आहे. आत्महत्या केलेल्या युवतीच्या घरच्यांनी संबंधित परिचित व्यक्ती विरोधात याप्रकरणी शुक्रवारी रात्री उशिरा कल्याण तालुका पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल केला आहे.

कल्याण तालुक्यातील ग्रामीण भागात गणेशोत्सव काळात घटना घडल्याने ग्रामीण भागात या घटनेने प्रचंड खळबळ उडाली आहे. 26 वर्षीय तरुणी गणपती बाप्पाचे मखराचे सजावटीचे काम करीत असताना तिच्या परिचित व्यक्तीने त्यांच्यातील असलेल्या संबंधित बाबींचा चार चौघात बोभाटा करेल अशी गर्भित धमकी भ्रमणध्वनीवर दिले असल्याचे दबक्या आवाजात गावात चर्चा सुरू झाली आहे. दोन दिवसांपूर्वी या युवतीने परिचित युवकाच्या धमकीला घाबरत आत्महत्या केल्याचे आता समोर आले आहे. युवतीच्या अंत्यसंस्कारानंतर सदर परिचित युवकाला कायद्याचा धाक आणि त्याचबरोबर कायदेशीर सजा मिळावी याकरिता युवतीच्या परिवाराने सरळ कल्याण तालुका पोलीस स्टेशन गाठीत घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला.

यापूर्वी देखील या युवकाने सदर युवतीकडून अनेक प्रकारच्या भेटवस्तू स्वीकारल्या होत्या, युवकाचे याबाबत मागणी सतत वाढू लागल्याने शेवटी त्याने युवतीला वारंवार फोन करून तिला ब्लॅकमेलिंग करू लागला होता. सततच्या ब्लॅकमेलिंगच्या प्रकाराला कंटाळात युवतीने अखेर आत्महत्या केली. याप्रकरणी कल्याण तालुका पोलीस स्टेशन मध्ये संबंधित युवकाविरोधात आत्महत्या करण्यास भाग पाडल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला असल्याची माहिती यावेळी पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणाचा तपास कल्याण तालुका पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दोरकर करीत असून अद्याप या ब्लॅकमेलिंग करत असणाऱ्या युवकाला ताब्यात घेतले नसल्याचे सांगण्यात आले आहे . युवतीने केलेल्या आत्महत्या प्रकरणामुळे कल्याण ग्रामीण भागात प्रचंड खळबळ उडाली असून पोलीस याप्रकरणी कसून तपास करीत आहेत.

# मुंबई उपनगर जिल्ह्यात अद्यावत क्रीडा संकुल विकसित करणार

### – पालकमंत्री ॲड. आशिष शेलार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : आजच्या युगात अभ्यासासोबत खेळाचे महत्त्व आहे. शासनाकडून आवश्यक ती सर्व मदत खेळाडूंना देण्यात येत आहे. याशिवाय मुंबई उपनगर जिल्ह्यात या वर्षांमध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाअंतर्गत एक अद्यावत क्रीडा संकुल विकसित करण्यात येत असून यामध्ये विविध प्रकारांच्या क्रीडा सुविधा उपलब्ध असतील असे मुंबई उपनगरचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले.




महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण विभागा अंतर्गत असणाऱ्या जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर द्वारा मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनाच्या निमित्त 29 ऑगस्ट हा राष्ट्रीय क्रीडा दिन कार्यक्रम उत्तर भारतीय संस्था हॉल, बांद्रा पूर्व येथे करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री ॲड. आशिष शेलार होते. यावेळी जिल्हाधिकारी सौरभ काटियार,एन स्वामी रंगास्वामी (समर ऑलिंपिक खेळाडू) आंतरराष्ट्रीय वेट लिफ्टिंग खेळाडू, श्री. विपुल घोष (द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित)उपस्थित होते.

पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विविध क्रीडा क्षेत्रामध्ये प्रविण्य प्राप्त खेळाडूंचे मुंबई उपनगर जिल्ह्याचा नावलौकिक वाढविल्याबद्दल विशेष आभार मानले.

या कार्यक्रमामध्ये मुंबई उपनगर जिल्ह्यातील विविध खेळातील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू, छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी अशा 11 पुरुष आणि महिला खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. तसेच पारंपरिक खेळाचा वारसा असलेल्या दहीहंडी खेळाच्या पथकांचे पार्ले स्पोर्ट्स या महिला गोविंदा पथक (सात थरांचा विश्व विक्रम) कोकण नगर गोविंदा पथक आणि जय जवान गोविंदा पथक (दहा थरांचा विश्व विक्रम ) यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी योगा आणि दहीहंडी या खेळांची प्रत्यक्षिके सादर करण्यात आली.

जिल्हयातील क्रीडा यशाबाबत आणि विविध उपक्रमबाबतची माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली. प्रस्तावना जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती रश्मी आंबेडकर यांनी केली. कार्यक्रमासाठी खेळाडू उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यलयाने विशेष प्रयत्न केले.

# ६ फुटांपेक्षा कमी उंचीच्या गणेश मुर्तीचे विसर्जन कृत्रिम विसर्जन स्थळी करा

## केडीएमसीचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली परिक्षेत्रात घरोघरी प्रतिष्ठापना केलेल्या दीड दिवसांच्या श्री गणेश मुर्तीचे विसर्जन महापालिकेने उभारलेल्या कृत्रिम तलावात करुन श्री गणेश भक्तांनी, कल्याण डोंबिवली महापालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांनी केलेल्या आवाहनास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

जल प्रदुषण टाळण्यासाठी आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार ६ फुटापेक्षा कमी उंचीच्या श्री गणेश मूर्तींचे विसर्जन कृत्रिम विसर्जन तलावात, कृत्रिम विसर्जन स्थळी करणे आवश्यक आहे. यासाठी महापालिकेने ठिकठिकाणी,महापालिकेच्या दहाही प्रभागात कृत्रिम तलावांची, कृत्रिम विसर्जन स्थळांची उभारणी केली आहे. त्याचप्रमाणे मोठया विसर्जन स्थळी, नैसर्गिक जलस्त्रोताच्या ठिकाणी देखील कृत्रिम विसर्जन स्थळाची सुविधा श्री गणेश भक्तांसाठी उपलब्ध करुन दिली आहे.

नागरिकांनी, श्री गणेश भक्तांनी महापालिकेने उपलब्ध केलेल्या या सुविधेचा लाभ घेऊन पर्यावरण रक्षणासाठी ,जलप्रदूषण रोखण्यासाठी आपला हातभार लावून महापालिकेत सहकार्य करावे असे आवाहन कल्याण डोंबिवली महापालिकेमार्फत करण्यात आले आहे.

# 'अतिधोकादायक इमारतींमधील रहिवाशांशी संवाद साधून इमारती तातडीने रिक्त कराव्यात'

## ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश

### ■ विरारमधील इमारत दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर घेतला आढावा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महापालिका क्षेत्रात असलेल्या ३७ अतिधोकादायक इमारतींमधील रहिवाशांशी संवाद साधून या इमारती तातडीने रिक्त कराव्यात, असे निर्देश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

विरार येथे घडलेल्या इमारत दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिका क्षेत्रातील अतिधोकादायक इमारतींचा पुन्हा आढावा घेण्यात आला. शुक्रवारी (२९ ऑगस्ट) सायंकाळी झालेल्या या आढावा बैठकीत आयुक्त सौरभ राव यांनी, अतिधोकादायक इमारतींमधील रहिवाशांशी सातत्याने संवाद साधून त्यांना अशा इमारतीत राहण्यास असलेल्या धोक्यांची कल्पना देऊन त्या इमारती लवकरात लवकर रिक्त करून घ्याव्यात, असे स्पष्ट केले. तसेच, ज्या धोकादायक इमारती रिक्त करून त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे, त्याबद्दलही रहिवाशांशी संवाद साधण्याचे निर्देश सहाय्यक आयुक्तांना दिले आहेत.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या दालनात झालेल्या या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगररचना सहायक संचालक संग्राम कानडे, उपायुक्त मनीष जोशी, उपायुक्त शंकर पाटोळे, उपायुक्त दिनेश तायडे, उपायुक्त सचिन सांगळे, उपनगर अभियंता सुधीर गायकवाड यांच्यासह सर्व प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त आणि सर्व कार्यकारी अभियंता उपस्थित होते.



ठाणे महापालिका क्षेत्रात एकूण ९३ अतिधोकादायक इमारती असून त्यापैकी ५६ इमारती रिक्त करण्यात आल्या आहेत. उर्वरित ३७ इमारतींमध्ये एकूण १९१ कुटुंबे वास्तव्यास आहेत. पावसाळ्यापूर्वीपासून परिमंडळ उपायुक्त आणि सहाय्यक आयुक्त या रहिवाशांशी संपर्क साधून इमारती रिक्त करण्यासंदर्भात विनंती करीत आहेत. महापालिका या इमारती रिक्त करून त्याचा ताबा कोणाकडेही देणार नाही. त्या इमारती रहिवाशांच्या ताब्यात राहतील, याविषयी रहिवाशांनी कोणतीही शंका मनात बाळगू नये, असेही आयुक्त राव यांनी पुन्हा स्पष्ट केले आहे. आपापल्या क्षेत्रातील सर्व अतिधोकादायक आणि धोकादायक इमारतींवर आवश्यक त्या सूचनांचे फलक पावसाळ्यापूर्वी लावण्यात आले होते. ते फलक पुन्हा लावण्यात यावेत. तसेच, धोकादायक इमारती कोणत्या प्रकारचे संकेत देतात याची माहिती घरोघरी पत्रकाद्वारे दिली जावी. रहिवाशांचे व्हाट्सअप ग्रुप करून त्यावरही त्यांना ही माहिती द्यावी. इमारतीमध्ये कोणत्याही प्रकारचे दुरुस्तीचे काम करण्यासाठी महापालिकेची परवानगी घेणे आवश्यक असल्याचेही रहिवाशांपर्यंत पोहोचवावे, असे आयुक्त राव यांनी सांगितले.

सर्व परिमंडळ उपायुक्त आणि सहाय्यक आयुक्त यांनी अतिधोकादायक इमारतीत अजूनही वास्तव्य करून असलेल्या रहिवाशांशी सातत्याने संपर्कात रहावे. त्यांना इमारती रिक्त करण्याविषयी विनंती करून इमारतीच्या ताब्याविषयी आश्वासत करावे. अतिधोकादायक इमारतीत राहणे जीवावर बेतू शकते, याची त्यांना कल्पना द्यावी असेही राव यांनी पुन्हा एकवार स्पष्ट केले आहे. सी वन वर्गवारीतील अतीधोकादायक इमारती पूर्णपणे रिक्त करणे आवश्यक आहे. तर, सी टू ए आणि बी या वर्गवारीतील धोकादायक इमारतींची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती करणे आवश्यक असते. दुरुस्ती काळात या धोकादायक इमारतीत कोणी वास्तव्य करू नये. याची माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत सर्व माध्यमांमधून पोहोचवावी. संबंधित इमारतीवर तसे फलक पुन्हा लावण्यात यावेत असे निर्देशही आयुक्त राव यांनी दिले.

**व्याप्त अतिधोकादायक इमारतींची (सी वन वर्गवारी)**
**प्रभाग समितीनिहाय संख्या**

| | |
|---|---|
| नौपाडा – कोपरी | २७ |
| उथळसर | ०७ |
| दिवा | ०२ |
| मुंब्रा | ०१ |
| वागळे | ०० |
| लोकमान्य नगर– सावरकर नगर | ०० |
| माजीवडा–मानपाडा | ०० |
| वर्तकनगर | ०० |
| कळवा | ०० |



## राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त पद्मश्री चैत्राम पवार करणार पर्यावरण संरक्षण विषयी मार्गदर्शन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील) : रमेश मित्र मंडळ, साठेपाडा (अबिटघर) या मंडळाच्या वतीने आयोजित सार्वजनिक गणेशोत्सव निमित्त आयोजित कार्यक्रमात व्याख्याते राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त पद्मश्री चैत्राम पवार हे जल, जंगल, जमीन या लोकसहभागातून पर्यावरणाचे संरक्षण विषयी व्याख्यान द्वारे मार्गदर्शन करणार आहेत.

रमेश मित्र मंडळाच्या वतीने आयोजित सार्वजनिक गणेशोत्सवाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यातच आदिवासी समाजातून पुढे आलेले नेतृत्व, ज्यांनी बारीपाडा या छोट्याशा आदिवासी पाड्याला जागतिक दर्जाची ओळख मिळवून दिली आणि आपल्या असामान्य पर्यावरण विषयक कामाने संपूर्ण भारताचे लक्ष आपल्याकडे वेधून घेऊन यावर्षीचा भारत सरकार कडून दिला जाणारा राष्ट्रपती पुरस्कार पद्मश्री हा नागरी सन्मान प्राप्त करणारे चैत्राम पवार यांच्या व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करून मंडळाने आपल्या वेगळेपणाची चुणूक दाखविली आहे.

गेल्या 27 वर्षांपासून हे मंडळ सातत्याने विविध उपक्रमाच्या माध्यमातून जनजागृती करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याचाच भाग म्हणून या वर्षी गणेशोत्सवाचे औचित्य साधून बुधवार दिनांक 3 सप्टेंबर रोजी पद्मश्री चैत्राम पवार यांचे व्याख्यान आणि त्यानंतर या वेळेत विद्यावाचस्पती रामायणाचार्य ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांच्या सुश्राव्य कीर्तनच्या कार्यक्रमाचे आयोजन करून समाजाला चांगल्या विचारांची देवाण घेवाण करण्याची संधी उपलब्ध करून दिली असल्याची माहिती मंडळाच्या सदस्या तथा आबिटघर ग्रामपंचायतीच्या सरपंच साक्षी संतोष साठे यांनी दिलेल्या प्रसिद्धी माध्यमांद्वारे म्हटले आहे.

## रायगड जिल्ह्यात
## राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : ग्रामीण आणि शहरी भागात क्रीडा संस्कृतीचा प्रसार व्हावा यासाठी हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. हा दिवस रायगड जिल्ह्यात उत्साहात साजरा करण्यात आला.

जिल्हा प्रशासन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथे मॅरेथॉन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. .कार्यक्रमास खासदार धैर्यशील पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले, शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे तसेच राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी श्रीमती तपस्वी गोंधळी उपस्थित होते. खासदार धैर्यशील पाटील यांनी खेळ केवळ मनोरंजन किंवा फिटनेससाठी मर्यादित न ठेवता करिअर म्हणून गंभीरतेने घ्यावा, असे आवाहन खेळाडूंना केले. ग्रामीण भागात क्रीडा सुविधा उपलब्ध करून दिल्यास उत्कृष्ट खेळाडू तयार होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच क्रीडाविकासासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.जिल्हाधिकारी श्री जावळे यांनी खेळामुळे शारीरिक व बौद्धिक क्षमतांचा विकास होतो, असे सांगून शासनाच्या बदलत्या क्रीडा धोरणांचा खेळाडूंनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.प्रस्ताविकेत जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी मेजर ध्यानचंद यांच्या कारकीर्दीचा आढावा घेत सांगितले की, त्यांनी सैन्यातून हॉकी खेळाला सुरुवात केली आणि कारकिर्दीत तब्बल १ हजाराहून अधिक गोलांची नोंद केली. त्यांच्या स्मरणार्थ सर्वोच्च 'ध्यानचंद क्रीडा पुरस्कार' जाहीर करण्यात आला असल्याचे त्यांनी नमूद केले.या निमित्ताने आयोजित ३ किमी मॅरेथॉन स्पर्धेत शंभरहून अधिक खेळाडूंनी विविध वयोगटातून सहभाग नोंदवला. तसेच जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी देखील उत्स्फूर्त सहभाग घेतला. या कार्यक्रमात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके जिंकलेल्या खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## केडीएमसीने २५ लोकसेवांची कालमर्यादा केली कमी
### नागरिकांना सेवा जलद गतीने उपलब्ध होणार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्र लोकसेवा हक्क सन 2015 च्या अध्यादेशानुसार शासनाकडील 68 आणि महापालिकेकडील 46 अशा एकूण 114 सेवा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने अधिसुचित केल्या आहेत. अधिसुचित करण्यात आलेल्या लोकसेवा जलद गतीने अर्जदारांना उपलब्ध करुन देता याव्यात या उद्देशाने शासनाने अधिसुचित केलेल्या या सेवापैकी 25 लोकसेवांची, शासन निर्णयाव्दारे विहीत करण्यात आलेली कालमर्यादा आता कमी करण्यात आली आहे.

यामध्ये (अ) दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. (ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण प्रमाणपत्र देणे, जलनि:सारण जोडणी देणे, अग्निशमन अंतिम नाहरकत दाखला देणे(महानगरपालिकेकरीता), पुन:कर आकारणी, रहिवास नसलेल्या मालमत्तांना करात सूट मिळणे, स्वंयमुल्यांकन, तात्पुरते कायस्वरुपी नळजोडणी खंडीत करणे, पुन:जोडणी करणे, प्लंबर परवाना नुतनीकरण करणे, परवान्याचे नुतनीकरण, परवानां हस्तांतरण, परवाना रद्द करणे, कालबाहय परवानासाठी नुतनीकरण सुचना या सेवांची विहित कालमर्यादा 15 दिवसावरुन 12 दिवस करण्यात आली आहे.

नळजोडणी देणे, परवाना दुय्यमप्रत, फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे या सेवांची विहित कालमर्यादा 15 दिवसावरुन 7 दिवस करण्यात आली आहे. तर व्यवसाय परवाना स्वयं-नुतनीकरण या सेवेची विहित कालमर्यादा 15 दिवसावरुन 10 दिवस करण्यात आली आहे. रस्ता खोदाई परवाना देणे, राज्य खादय परवान्याकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा नाहरकत दाखला, खादय नोंदणी प्रमाणपत्राकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा आरोग्य-विषयक ना हरकत दाखला या सेवांची विहित कालमर्यादा 30 दिवसावरुन 12 दिवस करण्यात आली आहे

महाराष्ट्र शुश्रुषा-गृह नोंदणी अधिनियम,1949 अंतर्गत शुश्रुषागृह परवान्याचे नुतनीकरण करणे. (महानगरपालिकेकरीता), महाराष्ट्र शुश्रुषा-गृह नोंदणी अधिनियम,1949 अंतर्गत परवान्यावर परवानाधारक भागिदाराचे नाव बदलणे. (महानगरपालिकेकरीता), लॉजिंग हाउस परवान्याचे नुतनीकरण करणे, मंगल कार्यालय सभागृह वगैरे परवान्याचे नुतनीकरण करणे या सेवांची विहित कालमर्यादा 30 दिवसावरुन 15 दिवस करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पाणी अनुपलब्धता प्रमाणपत्र देणे या सेवेची विहित कालमर्यादा 30 दिवसावरुन 07 दिवस करण्यात आली आहे. या सेवांचा कालावधी शासनाने शासन निर्णयाव्दारे कमी केल्यामुळे नागरिकांना या सेवा जलद गतीने उपलब्ध होणे सुलभ होणार आहे.

## ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक पदी भागवत सोनवणे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी), ठाणे येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून भागवत सोनवणे यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. त्यांनी संजय गोविलकर यांच्याकडून या पदाची सूत्रे हाती घेतली आहेत. संजय गोविलकर यांच्या कार्यकाळातही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अतिशय धाडसी कारवाया केल्या.



यापूर्वी श्री.सोनवणे हे महाराष्ट्र पोलीस दलात विविध महत्त्वाच्या पदांवर कार्यरत होते. त्यांच्याकडे गुन्हेगारी आणि भ्रष्टाचारविरोधी प्रकरणांचा तपास करण्याचा मोठा अनुभव आहे. त्यांनी नवी मुंबई येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागात पोलीस उप अधीक्षक पदावर धडाडीने काम केले आहे, ज्यामुळे त्यांना भ्रष्टाचारविरोधी मोहिमांची सखोल माहिती आहे. तसेच सहायक पोलीस आयुक्त, पनवेल विभाग, नागपूर शहर, मुंबई शहर, नाशिक शहर तसेच महाराष्ट्रातील ग्रामीण भागातही उत्कृष्ट सेवा बजावली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक श्री.शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून श्री.सोनवणे यांच्या नियुक्तीमुळे प्रशासकीय कामकाजात अधिक पारदर्शकता येईल आणि लाचखोरीला रोखण्यासाठी सुरू असलेल्या मोहिमांना बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्यावर विपरीत परिणाम : डॉ. काशीद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



ओतूर : "आजच्या बदलत्या जीवनशैलीमुळे आणि मोबाईलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांचे शारीरिक तसेच मानसिक आरोग्य धोक्यात येत आहे. शरीर आणि मन सुदृढ असल्यासच यश संपादन करणे शक्य होते. त्यामुळे मैदानी खेळांना प्रोत्साहन देणे आणि मुलांना मोबाईलपासून दूर ठेवणे पालकांनी आवश्यक आहे," असे प्रतिपादन ओतूर डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अमित काशीद यांनी केले.उदापूर येथील सरस्वती विद्यालयात क्रीडा दिनानिमित्त आयोजित माता पालक मेळाव्यात ते बोलत होते. या मेळाव्यात मोठ्या संख्येने महिला पालक उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक समस्या, पालकांची जबाबदारी आणि आधुनिक जीवनशैलीमुळे उद्भवणाऱ्या अडचणी यावर या वेळी उहापोह करण्यात आला.

डॉ. काशीद यांनी मोबाईलच्या आभासी जगात गुरफटलेल्या मुलांवर होणारे परिणाम स्पष्ट केले. त्याचबरोबर शारीरिक हालचाली अभावी लठ्ठपणा, डोळ्यांचे आजार, एकाग्रतेचा अभाव व मानसिक ताण वाढत असल्याचेही त्यांनी सांगितले. किशोरवयीन मुलींच्या समस्या, त्यावरील उपाय आणि त्यासाठी पालकांनी घ्यावयाची काळजी या विषयावरही विशेष मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमात डॉ. पुष्पलता शिंदे व डॉ. अवधूत वल्हवणकर यांनीही पालकांशी संवाद साधत आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारण्याचे महत्त्व पटवून दिले.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी उदापूरच्या माजी उपसरपंच डॉ. पुष्पलता शिंदे होत्या. कार्यक्रमाचे आयोजन महिला शिक्षिका सुरेखा ढमाले, रोहिणी घाटकर व सारिका मदन यांनी केले. मान्यवरांचा सत्कार मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांनी केला. आभार शिक्षक प्रतिनिधी भरत भाईक यांनी मानले.

## ओबीसी आरक्षण व समाजाची निर्णायक भूमिका स्पष्ट करण्यासाठी जिल्हास्तरीय एल्गार सभेचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : ओबीसी समाजाच्या आरक्षणावर निर्माण झालेले संकट पाहता ओबीसी आरक्षण अबाधित राखण्यासाठी व त्यावर समाजाची निर्णायक भूमिका स्पष्ट करण्यासाठी शहापूर येथील आगरी समाज सभागृह येथे ठाणे जिल्हास्तरीय एल्गार सभेचे आयोजन करण्यात आले होते.



या सभेत मराठा समाजाला कोणत्याही परिस्थितीत ओबीसीत घुसखोरी करू देऊ नये तसेच ओबीसी जनगणनेची अधिसूचना जाहीर झाली असली तरी जातनिहाय हा शब्द त्यात दिसून येत नाही म्हणून जातनिहाय जनगणना केली पाहिजे. ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहाची सोय त्वरित उपलब्ध होऊन ओबीसी विद्यार्थ्यांना शंभर टक्के शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे अशा अनेक मागण्यांसाठी या सभेचे आयोजन करण्यात आले होते तर या सभेत दिनांक 4 सप्टेंबर 2025 पासून राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे कार्यकर्ते व ओबीसी बांधव मोठ्या प्रमाणात साखळी उपोषण तालुकानिहाय करणार असल्याचे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे कोकण विभाग अध्यक्ष एकनाथ तारमळे यांनी म्हटले.

दरम्यान, ओबीसीच्या ताटातील हिसकावून ओबीसी लेकरा बाळांना उघड्यावर पाडू नका, सामाजिक असंतुलन बिगडवू देऊ नका. आज जरांगे मुंबईत आंदोलन करीत आहेत तर गरज पडल्यास ओबीसी समाजही रस्त्यावर उतरून मुंबई जाम केल्याशिवाय राहणार नाही असा सूचक इशारा राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रकाश भांगरथ यांनी यावेळी दिला आहे.

या सभेला प्रकाश भांगरथ, एकनाथ तारमळे, अपर्णा खाडे, बाळासाहेब खारीक, नारायण अंदाडे, प्रकाश गोंधळी,अनिल निचिते, प्रकाश पाटील, मिनानाथ तांदळे, काशिनाथ डोंगरे, अविनाश वेखंडे, स्वागत विशे, भिवंडी येथील सुरेश पाटील, सुनिल पाटील, डॉ रामचंद्र देसले, रमेश मुकादम, भगवान ठाकूर, ठाणे येथील अशोक विशे व इतर कल्याण येथील विश्वनाथ जाधव, जनार्दन पाटील व इतर मुरबाड येथील शंकर वडवले, योगेंद्र वेखंडे, मोहन पवार व इतर शहापूर परिसरातील अनेक ओबीसी बांधव या सभेला उपस्थित होते.

## दिलीप बांधनकर ३३ वर्षानंतर शासकीय सेवेतून निवृत्त



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण नगरपरिषद प्रशासनात ३३ वर्षाची प्रदीर्घ सेवा बजावून दिलीप दत्तात्रेय बांधणकर ३१ऑगष्ट २०२५ रोजी निवृत्त होत आहेत.आज नगरपरिषद अधिकारी कर्मचारी वर्गाने त्यांचा सेवानिवृत्तीचा सत्कार सोहळा मुख्याधिकारी जीवन पाटील यांचे अध्यक्षतेखाली सभागृहात उत्साहात संपन्न झाला.

यावेळी १९९२ते २००५ बॅच मधील सहकारी व अधिकारी वर्गाने बांधणकर यांच्या प्रशासनातील उत्तम सेवेचा आणि शांत संयमी स्ववाभाचे अनेक पैलू उलगडत त्यांचा गौरव केला. या सेवापूर्ती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक लेखापाल किरण शहा यांनी व्यक्त करताना सांगितले की नगरपरिषद सेवेत कर्मचारी म्हणून रूजू झाल्यानंतर सर्वात जास्त काम वसूली विभागात केले, पाणीपुरवठा विभाग आणि आता आस्थापना विभागात शांत स्वभाव आणि चोख काम करण्याची वृत्ती त्यांनी शेवटपर्यंत कायम ठेवली,याच कौतुक करावे तेवढे थोडेच अशा शब्दांत गौरविण्यात आले..

पाणी पुरवठा विभागाचे रमेश देशमुख म्हणाले जॅकवेल काम असो वा लाईनचे कुठेच कमतरता भासू न देणारा सहकारी होता तर सामान्य प्रशासन विभागाचे विश्वनाथ गायकवाड यांनी आठवणी सांगताना आम्ही सेवेत सोबत लागलेले १८सहकारी भारत दर्शनासाठी चार ही दिशांना फिरलो त्या प्रवास खर्चाचा खडानखडा हिशोब न चुकता देणारा तसेच नेहमी शांत डोक्याने काम करण्याची वृत्ती असलेला माझा सहकारी होता आणि नेहमीच राहील. याशिवाय मुख्याधिकारी जीवन पाटील, बांधकाम अभियंता सुहास कांबळे, शेखर अभंग यांनी मनोगत व्यक्त करुन दिलीप बांधणकर यांना शुभेच्छा दिल्या.. यावेळी नगर परिषद कर्मचारी संघटना, आस्थापना विभाग व इतर विभागातील सहकारी मित्रांनी भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन दिलीप बांधणकर यांचा सपत्नीक सत्कार करुन शासकीय सेवापूर्ती सोहळयाच्या शुभेच्छा दिल्या..सेवापूर्ती समारंभ याप्रसंगी मुख्याधिकारी जीवन पाटील लेखाधिकारी किरण शहा बांधकाम विभाग अभियंता सुहास कांबळे,आस्थापनाचे उमंग कदम, आरोग्य विभागाचे दयानंद गावंड, सामान्य प्रशासन विश्वनाथ गायकवाड कर निरीक्षक अमोल नप्ते, गोविंद भिसे,वसुली, पाणी पुरवठा विभाग प्रमुख रमेश देशमुख ,यांच्यासह इतर सर्व कर्मचारी महिला कर्मचारी दिलीप बांधणकर यांचे कुटुंबीयआई इंदू बांधनकर पत्नी साधना बांधणकर दोन मुलं दोन भाऊ बहीण असे या सोहळयाला उपस्थित होते.

## पुस्तक रूसले मोबाईल हसले
### गणपती देखाव्यातून सचिन पोतदारची भन्नाट सामाजिक जनजागृती!



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : यावर्षी मुरबाड शहरासह ग्रामीण भागात गणपती देखाव्यातून अनेक ठिकाणी सामाजिक विषय दाखवून त्यातून जनजागृती करण्याचे महत्वपुर्ण काम होत आहे. मुरबाड मधील सचिन पोतदार याने देखील एका महत्वाच्या विषयावर प्रकाश टाकला आहे.



नही ज्ञानेन सदृश ! पवित्र मिह विद्यते! पुस्तके ही ज्ञानाची पवित्र भांडारे आहेत.आणी हिच पुस्तके वाचून अनेक महान व्यक्ती घडल्या आहेत.एक काळ असा होता की लोकांना वाचनाची खुप आवड होती परंतु पुस्तके उपलब्ध होत नव्हती. तरीसुद्धा त्याकाळी वाचक वर्ग मिळेल तिथून पुस्तके, ग्रंथ जमा करत असे व आपल्या ज्ञानात भर घालत असे. परंतु आज इंटरनेट नेट जमाना आला ,नविन तंत्रज्ञान आले त्यामध्ये एका छोट्या मोबाईल फोनने सर्व काही हिरावून नेले. माणुस माणसापासून दूर गेला, एकाच घरातील माणसे मोबाईल मुळे एकमेकाशी संवाद करू शकत नाही. नुकत्याच जन्मलेल्या लहान बाळा पासून ते 90 वर्षाच्या वृद्धांना या मोबाईलने वेड लावले आहे. अति मोबाईलच्या वापरामुळे आज अनेक शारिरीक आजारांना, दुष्परिणामांना तोंड द्यावे लागत असले तरी मोबाईल हा एक जणू व्यसन झाले आहे आणी ते लवकर सुटेल असे तरी वाटत नाही.

इंटरनेटमुळे मोबाईल वर एका क्षणात माहिती उपलब्ध होत असल्याने कोणत्याही प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी पुस्तके उघडण्याची गरज नाही. याचा हळूहळू परिणाम माणसाची वाचनाची सवय कमी झाली असून भविष्यात विद्यार्थी सुद्धा पुस्तके कोणी उघडणार की नाही या बद्दल शंका निर्माण होत आहे, का सर्वच मोबाईलवर अवलंबून राहावे लागेल ही भिती या देखाव्यातून मुरबाड शहरातील सोनारपाडा येथील प्रसिद्ध चित्रकार सचिन रमेश पोतदार याने मोबाईल व इंटरनेटच्या रेडियशनमुळे पशु,पक्षी,व मानवी जीवनावर होणारे दुष्परिणाम अंत्यत कौशल्याने व हुशारीने दाखविले आहे. या कलाकाराचे सर्वत्र कौतूक होत आहे.

## पीओपीच्या मूर्तींचे विघटन करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ कल्याण टायगर्सचा पुढाकार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : संवर्धन निसर्गाचे, फायदा जनतेचा, अमृत-जलात हे ब्रीद डोळ्यासमोर ठेवून पीओपीच्या मूर्तींचे विघटन करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ कल्याण टायगर्सने पुढाकार घेतला असून कल्याण पूर्वेतील आमराई चौक आणि नाना पावशे चौक या दोन ठिकाणी अमृतजल उपक्रम सुरु करण्यात आला आहे.

जिप्सम सल्फेट (पीओपी) च्या मूर्ती अमोनियम बायकार्बोनेट च्या द्रावणात विरघळवण्याचे पर्यावरण पूर्वक तंत्र आणि सर्वोत्तम पर्याय पुण्यातील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (नॅशनल केमिकल लॅबोरेटरी-एन सी एल) पुणे येथील शास्त्रज्ञांनी 2015 मध्ये विकसित केले आहे. पीओपीचे अमोनियम सल्फेट व कैल्शियम कार्बोनेट मध्ये रूपांतर होते, जे द्रव आणि घन या दोन्ही स्वरूपात खत म्हणून वापरले जाऊ शकते. या तंत्रज्ञानाचा उद्देश गणेश उत्सव व इतर सणांमध्ये पीओपी मूर्तींच्या विसर्जनामुळे पाण्यात होणारे जल प्रदूषण कमी करणे हा आहे.




रोटरी क्लबच्या माध्यमातून रोटरी क्लब ऑफ अंबरनाथ नॉर्थने प्रथम या प्रोजेक्टची सुरुवात प्रोजेक्ट प्रमुख रोटेरियन राजेश भावसार यांचे मार्गदर्शन व संकलनेतून 2023 च्या गणपती उत्सवात पासून झाली. जिप्सम सल्फेट, कॅल्शियम सल्फेट, प्लास्टर ऑफ पॅरिस अर्थात पीओपी (Caso4) वेगवेगळी नावे असलेल्या या जादुई वस्तूच्या विळख्यातून शहराला सोडवण्यासाठी रोटरी क्लब ऑफ कल्याण टायगर्स तर्फे सर्व कल्याणकरांना पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आणि पेय जलसंपदा वाचवण्यासाठी एक नाविन्यपूर्ण उपक्रम रोटरी क्लब ऑफ कल्याण टायगर्सने हाती घेतला आहे.

पीओपी मूर्तीचे विसर्जन नदीमध्ये न करता रोटरी क्लब ने तयार केलेल्या कृत्रिम तळ्यातील अमृतजलात करावे. यामध्ये अमोनियम बायकार्बोनेट (NH4) HCO3, पाणी H2O व एन्जाईम यांचे तयार केलेले मिश्रण असून मूर्ती विसर्जन केल्यावर पीओपी मूर्तीवर अमृतजलाची अभिक्रिया सुरू होऊन तीन ते पाच दिवसात मूर्तीचे संपूर्ण विघटन होते. नंतर टाकीच्या तळाशी कॅल्शियम कार्बोनेट उरते व अमोनियम सल्फेट नावाचे एक उत्कृष्ट द्रव्य खत मिळते. कॅल्शियम कार्बोनेट चा उपयोग मातीतील कॅल्शियमची पूर्तता करण्यासाठी खत स्वरूपात अथवा खडू तयार करण्यासाठी होतो. तसेच शिल्लक उरलेले अमोनियम सल्फेट चा उत्कृष्ट द्रव्य खत म्हणून झाडांच्या वाढीसाठी उपयोग होतो.

गणपती उत्सवानंतर ठीक ठिकाणी विसर्जन स्थळावर ठीक ठिकाणी पडलेल्या भग्न अवस्थेतील, तुटलेल्या मुर्त्या बघून प्रत्येकाला वाईट वाटते. हे दृश्य बदलायचे असेल तर पीओपीच्या मुर्त्या अमृतजलात विसर्जन करण्याचे आवाहन रोटरी क्लब ऑफ कल्याण टायगर्सचे अध्यक्ष भूषण कोठावदे यांनी केले आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

*Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,*
*Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*
*Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024*